अधिकृत वाहन वितरकांमार्फत परिवहनेतर संवर्गातील नवीन दुचाकी व कार (Fully Built) वाहनांची नोंदणी करणेबाबत.

**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय ,**
५वा मजला, फाऊंटन दूरसंचार भवन-२,
महात्मा गांधी मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

Email ID - dycommr.enf1@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६१४७२६

क्र .एमव्हीआर-०९००/सीआर-८७९-(बी)/का.२(४)/जा.क्र. 6637 दिनांक 18 JUN 2021

**परिपत्रक क्र. 52/२०२१**

**वाचा** :- १. केंद्र शासन अधिसूचना क्र. एसओ ३११०(ई) दिनांक २८.०८.२०१९.
२.केंद्र शासन अधिसूचना क्र. एसओ १४३३ (ई) दिनांक ३१.०३.२०२१.
३. केंद्र शासन अधिसूचना क्र. जीएसआर २४०(ई) दिनांक ३१.०३.२०२१.
४. या कार्यालयाचे पत्र क्र.पआका/वाहन व सारथी४.०/का-११/२०२१/जा.क्र.६१८२ दि.०८.०६.२०२१

केंद्र शासनाच्या रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांचे संदर्भ क्रमांक १ अन्वये मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या तरतुदींमध्ये Act ३२ of २०१९ द्वारे सुधारणा केल्या आहेत. संदर्भ क्रमांक २ च्या अधिसूचनेनुसार कलम ४४ मध्ये सुधारणेची तरतूद दि.०१.०४.२०२१ पासून लागू झाली आहे.

२. कलम ४४ च्या तरतूदीनुसार केंद्र शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्ती यांना अधिन राहून याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकृत वाहन विक्रेत्याने (Authorised Dealer) मोटार वाहनाची विक्री केली तर नोंदणी प्राधिकारी यांचेकडे प्रथम नोंदणीच्या वेळेस वाहन हजर करण्याची आवश्यकता नाही.

३. उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ च्या अधिसूचनेव्दारे केंद्रिय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ४८ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार Vahan Portal वर अधिकृत वाहन विक्रेत्यास नवीन Fully Built वाहनाची नोंदणी करण्यासाठी तसेच शुल्क व कर भरता येतो. त्यानंतर नोंदणी क्रमांक पोर्टलव्दारे आपोआप (Automatically) दिला जातो. त्यानंतर वाहन विक्रेत्याकडून नियम ५० नुसार वाहनास नोंदणी क्रमांकाची प्लेट (HSRP) बसविली जाणार असून नोंदणी प्रमाणपत्र (नमुना २३अ) इलेक्ट्रॉनिकली जारी केले जाणार आहे. ज्या दिवशी वाहनास नोंदणी क्रमांक जारी होईल, त्या दिवशीचा दिनांक हा वाहनाचा नोंदणी दिनांक असणार आहे.

४. केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ४८B च्या तरतुदीनुसार अधिकृत वाहन विक्रेत्याने Fully Built मोटार वाहन विक्री केले असेल तर नोंदणी प्राधिकारी यांचेकडे नोंदणीसाठी वाहन हजर करण्याची गरज नाही. तथापि, मोटार वाहन निरीक्षक वा त्यापेक्षा वरच्या अधिकाऱ्यास वाहन विक्रेत्याकडील Inventory यादृच्छिक पध्दतीने तपासणी (Random Inspection) करता येणार आहे.

५. उपरोक्त तरतुदीनुसार राष्ट्रीय सूचना केंद्र यांनी नवीन Fully Built वाहनाच्या नोंदणीबाबत Vahan ४.० वर संगणक प्रणाली विकसित केलेली आहे. प्रथम नोंदणीच्या वेळेस वाहन तपासणीसाठी प्रत्यक्ष न सादर करण्याबाबत तसेच अनुसरावयाच्या संगणकीय कार्यपध्दतीबाबत या कार्यालयाच्या संदर्भ क्रमांक ४ च्या पत्रान्वये सर्व कार्यालयांना सूचना निर्गमित करण्यात आल्या.

६. उपरोक्त तरतूदींचा विचार करता, अधिकृत वाहन वितरकांमार्फत परिवहनेतर संवर्गातील नवीन दुचाकी व कार (Fully Built) वाहनांची नोंदणी करणेबाबत पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अंमलात येत आहे.

i) मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ४४ च्या तरतुदीनुसार परिवहनेतर संवर्गातील नवीन दुचाकी व कार (Fully Built) वाहनांच्या प्रथम नोंदणीसाठी मोटार वाहन निरिक्षकांमार्फत वाहन तपासणीची आवश्यकता नाही.

ii) वाहन वितरकास वाहनांच्या नोंदणीसाठी शुल्क, जर वित्तदात्याचे कर्जबोजा वाहनावर असेल तर HPA शुल्क, नोंदणी प्रमाणपत्र शुल्क व पोस्टाचे शुल्क तसेच देय मोटार वाहन कर इत्यादींचा भरणा करावा लागेल.

iii) नमुना २० मधील अर्ज, नमुना २१ मधील विक्री प्रमाणपत्र, नमुना २२ मधील Road Worthiness प्रमाणपत्र, Disclaimer, वाहनाच्या चॅसिस क्रमांकाचा व वाहनाचा फोटो, पॅन कार्ड, वाहनाचा विमा, जर बँकेचे कर्ज घेतले असेल तर नमुना ३४, पत्त्याचा पुरावा इत्यादी कागदपत्रे वितरकाने पीडीएफ (PDF) स्वरुपात प्रणालीवर अपलोड करावयाची असून Digital Signature Certificate (DSC) चा वापर करुन ई-स्वाक्षरी करावयाची आहे. त्यामुळे वाहनांची कागदपत्रे कार्यालयात प्रत्यक्ष सादर करण्याची आवश्यकता असणार नाही.

iv) वाहनास नोंदणी क्रमांक आपोआप जारी झाल्यावर वाहन विक्रेत्यास नियम ५० मध्ये नमूद केल्यानुसार HSRP बसवून देणे बंधनकारक असल्याने वाहनास HSRP प्लेट बसविल्याशिवाय वाहन मालकास वाहन ताब्यात देता येणार नाही.

v) नोंदणी प्रमाणपत्र प्रिंट करण्यापूर्वी नोंदणी प्राधिकारी यांनी वाहन विक्रेत्याने वाहन पोर्टलवर नोंदणी केलेल्या नवीन वाहनांची अपलोड केलेली कागदपत्रे, शुल्क, कर यांची तपासणी करावी.

vi) वाहन विक्रेत्याने चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे वाहनांची नोंदणी केली असेल, मोटार वाहन कराचा कमी भरणा केला असेल वा वाहनास HSRP बसविल्याशिवाय वाहन मालकास वाहन ताब्यात दिले असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित वाहन विक्रेत्यावर केंद्रिय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ४४ च्या तरतुदीनुसार कारवाई करावी. त्यासाठी प्रथम गुन्हयासाठी व्यवसाय प्रमाणपत्र १० दिवसाकरीता, दुसऱ्या गुन्हयासाठी व्यवसाय प्रमाणपत्र २० दिवसाकरीता, तिसऱ्या गुन्हयासाठी व्यवसाय प्रमाणपत्र ३० दिवसाकरीता निलंबित करण्यात यावे. त्यानंतरच्या गुन्हयासाठी व्यवसाय प्रमाणपत्र विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन रदद करण्याची कारवाई करावी.

vii) वाहन वितरकाने Homologation Portal वर उत्पादकाने दिलेल्या वाहनाच्या किंमतीनुसार वाहनाच्या मोटार वाहन कराचा भरणा कमी दराने केला असेल तर वाहन विक्रेत्याकडून व्याजासहीत कर फरक रक्कम वसूल करावी जेणेकरून लेखापरिक्षण केल्यानंतर आक्षेप नोंदविले जाणार नाहीत.

viii) नियम ४८B मधील तरतूदीनुसार मोटार वाहन निरीक्षकापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यांनी वाहन विक्रेत्याच्या आवारातील वाहनांच्या Inventory पैकी कोणत्याही वाहनांची प्रत्येक महिन्यातून किमान २ वेळा यादृच्छिक पध्दतीने (Randomly) तपासणी करावी.

७. सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी उपरोक्त सूचना त्यांच्या अखत्यारीतील सर्व अधिकृत वाहन वितरकांच्या निदर्शनास आणून देउन परिवहनेतर संवर्गातील नवीन दुचाकी व कार (Fully Built) वाहनांची नोंदणी सुकर व अचूक होईल, अशा पध्दतीने कार्यवाही करावी.

**(डॉ अविनाश ढाकणे)**
**परिवहन आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**प्रति,**
सर्व प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, महाराष्ट्र राज्य.

**प्रत:-**
१. मा. अपर मुख्य सचिव गृह (परिवहन)विभाग, मंत्रालय-३२, यांना माहितीस्तव सादर.
२. परिवहन उपायुक्त (संगणक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.

अधिकृत वाहन वितरकांमार्फत परिवहनेतर संवर्गातील नवीन दुचाकी व कार (Fully Built) वाहनांची नोंदणी करणेबाबत.

**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय ,**
५वा मजला, फाऊंटन दूरसंचार भवन-२,
महात्मा गांधी मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

Email ID - dycommr.enf1@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६१४७२६

क्र .एमव्हीआर-०९००/सीआर-८७९-(बी)/का.२(४)/जा.क्र. 10177 दिनांक 12 AUG 2021

**परिपत्रक क्र. 58 /२०२१**

**वाचा** :- १. केंद्र शासन अधिसूचना क्र. एसओ ३११०(ई) दिनांक २८.०८.२०१९.
२.केंद्र शासन अधिसूचना क्र. एसओ १४३३ (ई) दिनांक ३१.०३.२०२१.
३. केंद्र शासन अधिसूचना क्र. जीएसआर २४०(ई) दिनांक ३१.०३.२०२१.
४. या कार्यालयाचे पत्र क्र.पआाका/वाहन व सारथी४.०/का-११/२०२१/जा.क्र.६१८२ दि.०८.०६.२०२१
५.या कार्यालयाचे पत्र क्र.एमव्हीआर-०९००/सीआर-८७९(बी)/का.२(४)/जा.क्र.६६३७ दि.१८.०६.२०२१.

अधिकृत वाहन वितरकांमार्फत परिवहनेतर संवर्गातील नवीन दुचाकी व कार (Fully Built) वाहनांची नोंदणी करणेबाबत या कार्यालयाच्या संदर्भ क्रमांक ५ च्या पत्रान्वये सविस्तर सूचना जारी केल्या आहेत. तथापि, राज्यात ज्या ठिकाणचा पत्त्याचा पुरावा वाहन मालकाकडे नाही अशा ठिकाणच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत नोंदणी प्राधिकारी यांचेकडे नवीन दुचाकी व मोटार कार संवर्गातील वाहनांची नोंदणी करता येईल का ? याबाबत वाहन वितरकांमध्ये संभ्रम आहे.

केंद्र शासन अधिसूचना क्रमांक एसओ ३११० दिनांक २८.०८.२०१९ नुसार मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ४० मध्ये सुधारणा करण्यात येवून ती दिनांक ०१.०९.२०१९ पासून अंमलात आली आहे, ती तरतुद पुढील प्रमाणे :-

*"Subject to the provisions of section 42, section 43 and section 60, every owner of a motor vehicle shall cause the vehicle to be registered by any registering authority in the State in whose jurisdiction he has the residence or place of business where the vehicle is normally kept."*

तसेच मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ४१ (१) च्या दुसऱ्या परंतुकाची तरतुद पुढीलप्रमाणे आहे.

*"Provided further that in the case of a new motor vehicle, the application for registration in the State shall be made by the dealer of such motor vehicle, if the new motor vehicle is being registered in the same State in which the dealer is situated"*

उक्त कलमामध्ये नमूद तरतुदीनुसार वाहनाचा मालक राज्यामध्ये कोणत्याही वाहन वितरकाकडून वाहन विकत घेऊन नोंदणी प्राधिकाऱ्याकडे वाहन नोंदणीसाठी अर्ज करु शकतो. त्याप्रमाणे वाहन ४.० प्रणालीमध्ये आवश्यक बदल करण्यात आले आहेत.

वाहन खरेदी करणाऱ्या व्यक्तीने राज्यातील कोणत्याही वितरकाकडून वाहन खरेदी केल्यास वाहन ४.० या संगणक प्रणालीतील सुविधेनुसार राज्यातील कोणत्याही वितरकाला वाहन मालकाच्या तात्पुरत्या पत्यावर / व्यवसायाशी निगडित पत्ता अथवा रहिवासाच्या कायमस्वरुपी पत्त्यावर वाहनाची नोंदणी करता येईल.

उपरोक्त पार्श्वभुमिवर वाहन मालकाचा कायमस्वरुपी पत्ता व तात्पुरता पत्ता हा दोन वेगवेगळया नोंदणी प्राधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात येत असेल तर कार्यक्षेत्राच्या अनुषंगाने संबंधीत दोनपैकी कोणत्याही एका नोंदणी प्राधिकाऱ्याकडे वाहन वितरकास वाहनाची नोंदणी करता येईल.

(डॉ अविनाश ढाकणे)
परिवहन आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रति;**

- सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी

**प्रत :-**

परिवहन उपायुक्त(संगणक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना संगणक प्रणालीतील आवश्यक बदल करण्याच्या कार्यवाहीकरीता.